
वयोवृद्धः मनोयुवा

# महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक महासंघ (फेस्कॉम) मुंबई

संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये नोंदणी क्रमांक बी. ओ. एम. ८४३ /जीबीबीएसडी दि. २६/११/१९८१
मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था नियम १९५० अन्वये नोंदणी क्रमांक ७५२८/बीओएम दि. २५/४/१९८२

कार्यालय पत्ता : ज्येष्ठ नागरिक भवन, सेक्टर १२, प्लॉट नं. ७ सी, गावदेवी मंदिरामागे, नेरूळ (प.) नवी मुंबई-४००७०६




माता पिता को जितनी जरूरत हमें हमारे बचपन में होती है, उतनी ही जरूरत उनको बुढ़ापे में हमारी होती है....

# फेस्कॉमचे मुखपत्र : मनोहारी मनोयुवा

कार्यालय : अ/७, मिरज-मालगांव रस्ता, सुभाषनगर, ता. मिरज, जि. सांगली ४१६४३७

वर्ष : २९ अंक : ८ ऑगस्ट २०२१




वयोवृध्दः मनोयुवा

# महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक महासंघ (फेस्कॉम) मुंबई

महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक महासंघ (फेस्कॉम) मुंबई


## नियामक मंडळ २०१८-२०२१

**अध्यक्ष**



श्री. अरूण माधव रोडे

**उपाध्यक्ष**




श्री. आण्णासाहेब शहाजीराव टेकाळे

**मुख्य सचिव**




अभि. अरविंद काशिनाथ कुलकर्णी

**उपाध्यक्ष मुख्यालय**




श्री. विजय विनायक औंधे

**अति.मुख्य सचिव**




अभि. विनायक यशवंत पांडे

**कोषाध्यक्ष**




श्री. चंद्रकांत गणेश साळवेकर

**अतिरिक्त कोषाध्यक्ष**




श्री. आण्णासाहेब गुंडाप्पा दानोळे

**संपर्क सचिव**



श्री. दत्तात्रय कोंडीबाराव पाटील (मयत)

**संघटक सचिव**



श्री. उत्तमराव श्रावण तांबे

मारले जात. आपला ठावठिकाणी सांगणाऱ्याच्या पायात ते पत्रे ठोकत व त्यांचा आवाज बंद करत म्हणून त्यांना "पत्री सरकार" असेही म्हणत. पत्रीसरकारची कामे जगभर गाजली. शोषणमुक्त समाजरचना हे त्यांचे उद्दिष्ट होते. थोडक्यात पत्रीसरकारने आणले आदर्श लोकराज्य.

चव्वेचाळीस महिन्यांच्या भूमीगत काळात, नाना पाटलांना अनेकदा अग्निपरीक्षा द्यावी लागली . इंग्रज सरकारने त्यांना पकडण्यासाठी पाच हजार रुपयांचे इनाम घोषीत केले होते. अशातच त्यांची आई निधन पावली. अंत्यदर्शन घ्यायला नाना येणार हे ओळखून व आपल्याला इनाम मिळावे या हेतूने पोलिसांनी त्यांच्या घराभोवती कडक बंदोबस्त ठेवला. आता अंत्यदर्शन घ्यायचे कसे असा नानांना प्रश्न पडला . तेव्हा ते चक्क स्त्री वेशात आले. दर्शन घेऊन तिरडीवरुन त्यांना सहकाऱ्यांनी पळवले ही .. मग आईला नेले. तेव्हा आपल्या हातावर नानांनी तुरी दिल्याचे पोलिसांच्या लक्षात आले.

दिनांक १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वातंत्र्यसूर्य उगवला आणि क्रांतिसिंह आपल्या अनुयायांसह प्रकट झाला . अशाप्रकारे प्रस्थापित समाजव्यवस्थेला आव्हान देऊन, अंधश्रध्दा झुकारुन , बुध्दीवादाचे शस्त्र हाती घेऊन सर्वांगीण क्रांतीचा ध्वज नानांनी उंचच उंच धरला आणि जनशक्तीचा शिवनेत्र जागृत करुन स्वातंत्र्याचा ध्वज फडकताना पाहिला. अशा ह्या कामगार कष्टकऱ्यांच्या चळवळीत अखेरपर्यंत अग्रेसर राहिलेल्या मोठ्या मनाच्या , मोठ्या माणसाला त्रिवारवंदन!

---

# भारताच्या पहिल्या स्वातंत्र्यदिनाची आठवण

अलका विंचू
खेड (रत्नागिरी)
मोबाईल : ९५५२०९०५४९

आज आपण भारताचा स्वातंत्र्यदिन साजरा करीत आहोत . यंदा पाऊसही भरपूर झाला . या पडणाऱ्या पावसाकडे पाहता पाहता मला माझ्या बालपणाची म्हणजेच भारताच्या १५ ऑगस्ट १९४७ च्या पहिल्या स्वातंत्र्यदिनाची आठवण झाली . दिडशे वर्ष इंग्रजांनी भारतावर राज्य केले . रेशनच्या दुकानात , इंग्लंडला जी तांबडी ज्वारी गुरांना घालत ती आणि मका अशी धान्ये , जडे भरडे कापडही तिकडून बोटीने इकडे आणून विकत. अगदी रॉकेल, खजूर सुध्दा रेशनवर मिळे . जळवा लावल्यासारखा आपला देश त्यांनी लुटला . शेवटी १८१७ पासून आपल्या अगणित माणसांनी उठाव केला . कित्येक चळवळी केल्या , सत्याग्रह केले . कित्येकजण फासावर गेले आणि शेवटी १५ ऑगस्ट हा दिवस सोन्याचा उगवला . १५ ऑगस्ट १९४७ साली देश स्वतंत्र झाला । सगळीकडे आनंदी आनंद झाला !!

माझ माहेर वाईला . आमच्या वाई गावच्या सर्व शाळा , सर्व रस्ते फुलांच्या माळांनी आणि पताकांनी सजविले होते . म्युनिसिपालीटीच्या मैदानात झेंडावंदन व्हायचे होते . वाई शहरातील सर्व शाळा , सर्व कार्यालयातील , सर्व गावातील सर्व माणसे मैदानात जमली होती . गर्दी उसळली होती "भारत माता की जय" , "वंदे मातरम्" घोषणांनी वातावरण दुमदुमून गेले होते . मैदानात गेल्यावर आम्हाला हल्लीच्या ५० पैशाच्या नाण्याच्या आकाराचा एक बिल्ला मिळाला . त्यावर तिरंगी ध्वजाचा छाप होता . त्याला पिन होती . सर्व मुलांनी तो आपल्या छातीवर लावाला , मी डाव्या हाताने तो गच्च धरुन ठेवला . सर्व मुलांची अशीच अवस्था होती . दिडशे (१५०) वर्षांनी मिळालेले स्वातंत्र्य जणू सर्वजण मुठीत गच्च, गच्च धरुन ठेवत होते . नंतर एक मोठा खाऊचा पुडा मिळाला . मन कसं आनंदान गोंधळून गेले होते .

एवढ्यात मोठ्या चौथऱ्यावर सर्व मान्यवर आणि प्रमुख पाहुणे आले . त्यांच्या हस्ते तिरंगी ध्वज फडकविला गेला . सर्वांनी झेंड्याला सलामी दिली . "जनगणमन"... राष्ट्रगीत सुरु झाले . भारताचा तिरंगा डौलाने फडकू लागला . भारतमातेच्या मस्तकावर स्वातंत्र्याचा मुकुट विराजमान झाला , " विजयी विश्व तिरंगा प्यारा ... " गीत झाले . एवढ्यात पावसाची एक सर आली. तिलाही जणू हा सोहळा पहायचा होता . सार कसं छान छान वाटत होत. मन गोंधळल होत । पण नेमक , नेटक कळण्याच वय तरी कुठ होत ? ८- ९ वर्षाच तर ते वय होत . आज या वृध्द वयात ७० वर्ष मागे वळून पहाते , तेव्हा सर्व आठवणी पुन्हा पुन्हा जागृत होतात . अभिमानाने उर भरुन येतो . पारतंत्र व स्वातंत्र्य अनुभवलेली आमची पिढी "भारताचा पहिला स्वातंत्र्य दिन पाहण्याचं/ अनुभविण्याच" भाग्य मिळालं म्हणून धन्य धन्य वाटते !!!


वयोवृध्दः मनोयुवा

# महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक महासंघ (फेस्कॉम) मुंबई


हार्दिक अभिनंदन

## महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक महासंघ (फेस्कॉम) मुंबई

हार्दिक अभिनंदन



श्री. सी.के. नलवडे
अध्यक्ष




देवाप्पा चव्हाण
उपाध्यक्ष

मार्गदर्शक



अभि.अरविंद कुलकर्णी
फेस्कॉम मुख्य सचिव

मार्गदर्शक




आण्णासाहे दानोळे
फेस्कॉम अति.कोषाध्यक्ष



श्रीकांत शहा
सचिव




सोमनाथ गवस
सहसचिव




शरद फडके
कोषाध्यक्ष



श्रीमती विभा शहा
सदस्या



विजय चव्हाण
सदस्य



बाबासो व्हनाळे
सदस्य




धनाजी देसाई
सदस्य




प्रा.डॉ.सौ. सुशिला ओडेयर
स्विकृत सदस्या




श्रीमती शरयु खत्री
स्विकृत सदस्या



वसंतराव थोरात
संपर्क सचिव



बाळासाहेब फराकटे
संघटक सचिव





डॉ. मानसिंगराव जगताप
पदसिध्द सदस्य

## महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक महासंघ (फेस्कॉम) प्रादेशिक विभाग, कोल्हापूर

# महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक महासंघ (फेस्कॉम) मुंबई


## || हार्दिक शुभेच्छा ||


श्री. पी.के. माने
अध्यक्ष



श्री. यशवंतराव चव्हाण
उपाध्यक्ष


मार्गदर्शक


श्री. अंजुमन खान
फेस्कॉम उपाध्यक्ष व प्रमुख मनोयुवा कौन्सिल



श्री. आर. ए. देसाई
सचिव


श्री. जयवंतराव गायकवाड
सहसचिव


श्री. एस. ए. पाटील
कोषाध्यक्ष



श्रीमती सुलोचना माने
सदस्या



श्री. आनंदराव पाटील
सदस्य



श्री. एल. ए. पाटील
सदस्य


श्री. संभाजी माळी
सदस्य


श्रीमती चेतनादेवी खुरपे
स्विकृत सदस्या


श्री. बी.ए. मासुले
संपर्क सचिव


श्री. तुकाराम पवार
संघटक सचिव


श्रीमती वासंती मेरू
स्विकृत सदस्या

## महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक महासंघ (फेस्कॉम) प्रादेशिक विभाग, सांगली

कृपया अंक पत्त्यावर द्यावा. वितरीत न झालेस सकारण परत करावा.
अपूर्ण पत्ता : ☐ मयत : ☐ पत्ता सोडून गेले : ☐ पोस्टमन बीट क्र. ☐

PRINTED MATTER

प्रेषक,
श्री. अंजुमन खान
उपाध्यक्ष व प्रमुख फेस्कॉम मनोयुवा कौन्सिल,
सुभाषनगर, ता. मिरज, जि. सांगली. ४१६४३७
मोबा. ९४२२५८३००४

प्रति,

Periodical Registered with Press Registrar of India RNI No. MAHMAR/2003/10732